# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# महापालिका आयुक्तांवर कारवाई करा!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अमोल थोरात यांची मागणी

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** १५०० कोटींच्या टीडीआर घोटाळ्यातून महायुती सरकार आणि भाजपाची प्रतिमा डागाळणाऱ्या पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी भाजपचे माजी संघटन सरचिटणीस अमोल थोरात यांनी केली आहे. अमोल थोरात यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा १५०० कोटींचा टीडीआर घोटाळा समोर आला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत वाकड येथे पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाला लागून सर्व्हे क्रमांक १२२ मध्ये क्रमांक ४/३८ या जागेत पीएमपीएमएल डेपो व ट्रक टर्मिनल पार्किंगसाठी आरक्षण आहे. या आरक्षित जागेचे एकूण क्षेत्रफळ १० हजार २७४ चौरस मीटर आहे. ही जागा टीडीआरचा मोबदला देऊन विलास जावडेकर इन्फिनिटी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडतर्फे संचालक सर्वेश विलास जावडेकर व आदित्य विलास जावडेकर यांच्याकडून महापालिकेच्या ताब्यात घेण्याचा निर्णय महापालिकेने घेतला. त्यानंतर त्याच विलास जावडेकर इन्फिनिटी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या बिल्डरला ही आरक्षणाची जागा भूखंड एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकासित करण्यास देण्याचा प्रशासकीय प्रवास सुरू झाला. हा प्रशासकीय प्रवास १५०० कोटींचा जादाचा टीडीआर देण्यापर्यंत पोहोचला. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित बिल्डरला बांधकाम परवानगी, टीडीआरची मंजुरी, सुधारित बांधकाम परवानगीचे सोपस्कार पूर्ण करून सर्व मंजुरी तातडीने दिली. टीडीआरचा दर कायद्याने ठरलेला आहे. वाकड येथील जागेचा रेडी रेकनरनुसार दर प्रति चौरस मीटर २६ हजार ६२० रुपये आहे. मात्र पिंपरी-चिंचवड महापालिकेने तब्बल ६५ हजार ०६९ रुपये प्रति चौरस मीटर दराने संबंधित बिल्डरला टीडीआर दिला. या जादा दराने दिलेल्या टीडीआरमुळे बिल्डरचा तब्बल १५०० कोटीहून अधिकचा फायदा झाला. महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमताने एका बिल्डरला फायदा पोहोचवण्याच्या उद्देशाने तब्बल १५०० कोटींचा जादा टीडीआर दिला. राज्यातील महायुतीचे सरकार सर्वोत्तम काम करीत आहे. सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासह भ्रष्टाचाराला आळा घालण्याचा प्रयत्न महायुती सरकारकडून होत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि अमित शहा यांच्या नेतृत्त्वात भारतीय जनता पार्टी देशात सकारात्मक वातावरण निर्मिती करीत आहे. त्यामुळे पक्षाची आणि सरकारची प्रतिमा उजळत आहे. असे असताना पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केलेल्या टीडीआर घोटाळ्यामुळे महायुती सरकार तसेच भाजपाची प्रतिमा डागाळण्याचे काम केले आहे. त्यामुळे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यावर सरकारकडून कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. याप्रकरणी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना सक्तीच्या रजेवर पाठवून सखोल चौकशी करण्यात यावी. तसेच इतर दोषींवर देखील कारवाई करावी अशी मागणी अमोल थोरात यांनी केली आहे.





# भोसरीतील अंतर्गत रस्ते प्रशस्त करण्याचा संकल्प!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांसह मध्यवस्तीतील अंतर्गत रस्ते प्रशस्त करण्याचा संकल्प असून, त्यासाठी महापालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय आणि पीएमआरडीए अशा अस्थापनांकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करीत आहोत, अशी माहिती भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली. इंद्रायणीनगर येथे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या श्रीकृष्णपुरम ते लांडगेनगरला जोडणाऱ्या रस्त्याचे काम अखेर मार्गी लागले. या रस्त्याचे भूमिपूजन आमदार महेश लांडगे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगरसेविका नम्रता लोंढे, राजर्षि शाहु महाराज प्रतिष्ठानचे संस्थापक योगेश लोंढे, शिवराज लांडगे, योगेश लांडगे, हिरामण लांडगे, शेखर लांडगे, संतोष लांडगे, रमेश लांडगे यांच्यासह स्थानिक नागरिक व उद्योजक उपस्थित होते. तसेच, प्राधिकरण आणि महापालिका प्रशासनाच्या समन्वयाअभावी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कृष्णपुरम येथे लांडगेनगर ते इंद्रायणीनगरला जोडणाऱ्या ३० मीटर रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली होती. आमदार विशेष निधीतून हे काम करण्यात येत आहे. दरम्यान, गुरूविहार कॉलनी येथील सर्वात जुने गणेश मंदिरासाठी सभामंडपाचे छत नादुरूस्त झाले होते. त्यामुळे कॉलनीतील सभासदांनी सदर सभामंडप नवीन उभारावा, अशी मागणी केली होती.

# शिरूरमध्ये जाऊन मुख्यमंत्री शिंदेंची उद्धव ठाकरेंवर टीका!

## अढळराव पाटलांच्या उमेदवारीवर कोणतंही भाष्य नाही

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** दीड वर्षापूर्वी मी शिवसेना वाचवण्याची भूमिका घेतली, पण ज्यांनी सातत्याने खोटं बोलनू अनेकांचा अपमान केला त्यांची जागा दाखवून द्यावी लागेल असं वक्तव्य करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसंकल्प अभियानाची शिरूर मतदारसंघातील खेड या ठिकाणाहून सुरवात झाली. त्यावेळी ते बोलत होते. अजित पवारांनी दावा केलेल्या या मतदारसंघातील





शिवाजीराव अढळराव पाटलांच्या यांच्या उमेदरवारीवर मात्र मुख्यमंत्री काहीही बोलले नाहीत. पुण्यातील शिरूर लोकसभा मतदारसंघावर अजित पवार गटाने या आधीच दावा केला असून या ठिकाणाहून इच्छुक असलेले उमेदवार आणि माजी खासदार अढळराव पाटील हे शिंदे गटात आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज शिवाजीराव अढळराव पाटील यांच्या उमेदवारीवर काही बोलणार काय याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अढळरावांच्या कामाचे कौतुक केलं, मात्र त्यांच्या उमेदवारीवर कोणतंही भाष्य केलं नाही. ठाकरेंची साथ सोडून आपण दीड वर्षाप्रूवी शिवसेना वाचवण्याची भूमिका घेतल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. ते म्हणाले की, ‘‘खोटं बोलून त्यांनी युती तोडली, हजारो लाखो माणसांचा विश्वासघात केला, त्यांनी शिवसैनिकांशी गद्दारी केली, त्यांना आता धडा शिकवायची वेळ आली आहे. आता आपल्या पक्षात रोज लोक प्रवेश करतात, मग मी जर चुकलो असतो तर एवढ्या मोठ्या प्रमाणावर साथ मिळाली असती का? हजारो, लाखो शिवसैनिक विश्वासाने भगवा खांद्यावर घेत आहेत. शिवसेना वाचवण्याची भूमिका मी घेतली.‘‘ एकनाथ शिंदे म्हणाले की, एका शिवसैनिकाला मुख्यमंत्री करणार असल्याची घोषणा बाळासाहेबांनी केली होती, १९९५ साली सत्ता आल्यानंतर बाळासाहेबांनी ठरवलं असतं तर ते मुख्यमंत्रीपदी बसले असते. पण त्यांनी तसं केलं नाही. मुख्यमंत्रीपदाची संधी आली त्यावेळी मात्र उद्धव ठाकरे यांनी उडी मारून त्या जागी बसले. आपल्याला महाराष्ट्रातून ४५ हून जागा जिंकायच्या असून मोदींचे हात बळकट करायचे आहेत असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. ते म्हणाले की, या पुढच्या निवडणुका या महायुतीच्या माध्यमातून एकदिलाने लढवायच्या आहेत. आपल्यासाठी लोकांचे वातावरण चांगलं आहे. विरोधकांकडे काहीही मुद्दे नाहीत.

# ज्या कोर्टात काम, त्याच कोर्टात काम तमाम!

## शरद मोहोळ हत्या प्रकरणात दोन वकिलांचा सहभाग

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शरद मोहोळ खून प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे, शरद मोहोळ खून प्रकरणात दोन नामांकित वकीलांचा सहभाग असल्याची समोर आली आहे. पुणे गुन्हे शाखेच्या पथकाने या दोघांनाही काल इतर आरोपींसोबत रात्री अटक केली. आरोपींना कट रचण्यात आणि त्यांना पळून लावण्यात या वकिलांनी मदत केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. शरद मोहोळ खून प्रकरणातील दोन आरोपी हे वकील आहेत. दोन्ही आरोपी हे पुण्याच्या शिवाजीनगर न्यायालयात प्रॅक्टिस करतात. रवींद्र पवार आणि संजय उड्डाण अशी आरपी वकिलांची नावे आहे. पुणे गुन्हे शाखेच्या पथकाने या दोघांनाही काल इतर आरोपींसोबत रात्री अटक केली. आरोपींना कट रचण्यात आणि त्यांना पळून लावण्यात या वकिलांनी मदत केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. दोन्ही वकिलांना थोड्याच वेळात कोर्टात हजर करणार आहेत. शरद मोहोळ हत्या प्रकरणात या दोन वकिलांचा काय सहभाग होता? या प्रकरणात आणखी मोठ्या व्यक्तीचा



सहभग आहे का? हत्येचे नेमकं कारण काय? याचा तपास पोलिस करत आहे. शरद मोहोळवर गोळीबार करणारे मारेकऱ्यांनी सातारच्या दिशेने वाहनातून पळायचं ठरवल होतं. मात्र त्यांच्या गाड्यांचे नंबर ट्रेस करुन पुणे पोलिसांनी लागलीच त्यांचा पाठलाग सुरु केला आणि शिरवळ जवळ पाठलाग करून आठ जणांना अटक केली. त्यांच्याकडून तीन पिस्तुले जप्त करण्यात आली आहेत. या आठ आरोपीमध्ये या दोन वकिलांचा देखील सहभाग होता. मुख्य आरोपी देखील वकिलांकडे सुरूवात केली आहे. आरोपींना पळून जाण्यास वकिलांनी मदत केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. शरद मोहोळने त्याच्या पत्नीसोबत वाढदिवस साजरा केला. लग्नाच्या वाढदिवसाच्या दिवशी त्याची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. कुख्यात गुंड शरद मोहोळ हत्येचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. यामध्ये स्पष्ट दिसत आहे की, शरद मोहोळसोबत सावलीप्रमाणे चालणाऱ्या त्याच्या साथीदारांनीच त्याच्यावर पिस्तुलातूव गोळ्या झाडल्या, ज्यामुळे त्याचा अंत झाला.शरद मोहोळ खून प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे, शरद मोहोळ खून प्रकरणात दोन नामांकित वकीलांचा सहभाग असल्याची समोर आली आहे. पुणे गुन्हे शाखेच्या पथकाने या दोघांनाही काल इतर आरोपींसोबत रात्री अटक केली. आरोपींना कट रचण्यात आणि त्यांना पळून लावण्यात या वकिलांनी मदत केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. शरद मोहोळ खून प्रकरणातील दोन आरोपी हे वकील आहेत.